दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ४३ • Title - Code :- MAHMAR49513 • शुक्रवार दि.३ नोव्हेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## मनोज जरांगेंनी उपोषण घेतलं मागे

# मराठा आरक्षण देण्यासाठी सरकारला २ जानेवारीपर्यंतचा वेळ दिला वाढवून



**जालना । प्रतिनिधी**

सरकारचे शिष्टमंडळ मनोज जरांगे पाटील यांची समजूत काढण्यासाठी आंतरवाली सराटी येथे गेले होते. यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समुदायाला सरसकट आरक्षण देणार असतील तर सरकारला आणखी वेळ देण्यास हरकत नाही असं वक्तव्य केलं. त्यानंतर त्यांनी सरकारला २४ डिसेंबरपर्यंतचा वेळ देत उपोषण तुर्तास मागे घेण्याचा निर्णय घेतलाय.मराठवाड्यातील मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळत आहेत. पण, उर्वरित महाराष्ट्राचं काय? आपल्या भाऊबंधूंना देखील आरक्षण मिळायला पाहिजे. सगळ्यांची दिवाळी गोड झाली पाहिजे. त्यामुळे सरकार आणखी थोडा वेळ मागत असेल तर आपण त्यांना तो देऊ. सरकार मराठा आरक्षण द्यायला तयार झालं आहे. वेळ घ्या, पण सरसकट आरक्षण द्या, असं जरांगे पाटील म्हणाले.आणखी थोडा वेळ दिल्याने काही फरत पडत नाही. मराठा समुदायाचा अपमान होऊ देणार नाही. जरांगे पाटील यांनी २४ डिसेंबरपर्यंत वेळ देण्याची तयारी केली होती. पण, सरकारच्या शिष्टमंडळाने २ जानेवारीपर्यंत वेळ मागितला. यावेळी जरांगे पाटलांनी वेळ वाढवून देण्यास नकार दिला.शिंदे समितीने दोन महिन्यामध्ये कुणबी प्रमाणपत्र वाटायला सुरवात करावी. नात्यातील सर्व व्यक्तींना प्रमाणपत्र देण्यात यावीत. सरकारला दोन महिन्यांचा वेळ देत आहे. पण, दिलेली ही वेळ शेवटची असेल. यापुढे सरकारला कसलाही वेळ दिला जाणार नाही. मी उंबऱ्याला शिवणार नाही अन् साखळी उपोषण थांबणार नाही. आज आरक्षण फक्त स्थगित होणार आहे, असं जरांगे पाटील यांनी स्पष्ट केलं.सरकारचे शिष्टमंडळ आणि जरांगे पाटील यांच्यात चर्चा सुरु झाली होती. यावेळी मंत्री उदय सामंत, संदीपान भुमरे, बच्चू कडू, धनंजय मुडे इत्यादी नेत्यांनी जरांगे पाटलांशी चर्चा केली. याआधी दोन माजी न्यायमूर्तींनी त्यांची भेट घेतली होती. यावेळी त्यांची सकारात्मक चर्चा झाली होती. त्यानंतर जरांगे पाटील यांनी उपोषण सोडण्याचा निर्णय घेतला.

### आमदार बच्चू कडूंची मध्यस्थी

आज राज्य सरकारचं शिष्टमंडळ अंतरवाली सराटीत जाणार आहे. या शिष्टमंडळासोबत नेमके कोणते मंत्री तसेच नेते जाणार? याबाबत अजूनही स्पष्टता नाही. मात्र, या शिष्टमंडळात राज्याचे सचिव जाणार असून जरांगे यांना उपोषण मागे घ्या, अशी विनंती केली जाणार आहे. दरम्यान, बुधवारी आमदार बच्चू कडू यांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. कडूंनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करुन पुन्हा मनोज जरांगे यांच्याशी बातचित केली. गुरुवारी शिष्टमंडळ भेटीसाठी येणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याचं बच्चू कडूंनी जरांगेंना सांगितलं. मनोज जरांगे यांनी पाणी बंद केलं असून सरकारसोबत आता शेवटची चर्चा होईल, असं स्पष्ट केले आहे. राज्य सरकारने मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी प्रवर्गातून आरक्षण द्यावे, अशी मागणी जरांगेंनी लावून धरलेली आहे.



### विशेष अधिवेशन बोलवण्याची तयारी

मनोज जरांगे यांच्या भेटीसाठी राज्य सरकारचं शिष्टमंडळ जालन्यात गेलं. त्यावेळी शिष्टमंडळाने या प्रश्नी घाई गडबड न करता टिकणारं आरक्षण देण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील असल्याचं सांगितलं. तसेच मराठा आरक्षणाच्या प्रश्नी ८ डिसेंबर रोजी विशेष अधिवेशन घेणार असल्याचंही आश्वासन दिलं.

## केसीआर सरकारवर बांधकामात भ्रष्टाचाराचा आरोप केल्यानंतर राहुल गांधींनी मेडिगड्डा बॅरेजला दिली भेट

**गडचिरोली । प्रतिनिधी**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी गुरुवारी महाराष्ट्र – तेलंगणा सीमेवरील वाहणाऱ्या गोदावरी नदीवर उभारलेल्या कालेश्वरम उपसा सिंचन प्रकल्पाचा एक भाग असलेल्या मेडिगड्डा (लक्ष्मी) बॅरेजला भेट दिली, बांधकामाचा दर्जा निकृष्ट असून बीआरएस सरकारवर भ्रष्टाचाराचे आरोप त्यांनी केले.

सध्या तेलंगणात प्रचार करत असलेले राहुल गांधी हैदराबादहून हेलिकॉप्टरने जयशंकर भूपालपल्ली येथील आंबटपल्ली गावातून बॅरेजवर पोहोचले. प्रदेश काँग्रेसच्या नेत्यांसमवेत त्यांनी नुकसान झालेल्या बॅरेजची पाहणी केली. यावेळी तेलंगणा प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ए. रेवंत रेड्डी, काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते मल्लू भट्टी विक्रमार्का, आमदार श्रीधर बाबू आणि इतर नेते राहुल गांधींसोबत होते.बॅरेजला भेट देण्यापूर्वी त्यांनी



आंबटपल्ली गावात महिलांच्या सभेला संबोधित केले.त्यांनी केसीआर सरकारचा सर्वात मोठा घोटाळा म्हणून कालेश्वरमचे वर्णन केले. मला हे वैयक्तिकरित्या पहायचे होते आणि म्हणूनच मी येथे आलो आहे, असे ते म्हणाले.या प्रकल्पात मुख्यमंत्री केसीआर यांनी तेलंगणातील जनतेकडून एक लाख कोटी रुपयांची लूट केल्याचा आरोप त्यांनी केला.तर, या प्रकल्पाचा लोकांना फायदा झाला नसल्याचा दावाही त्यांनी केला.या घोटाळ्यावर प्रकाश टाकण्यासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी कार्यक्रमस्थळी उभारलेल्या 'कालेश्वरम एटीएम'कडे बोट दाखवत राहुल गांधी यांनी 'कलेश्वरम केसीआर एटीएम' असे नामकरण करण्याची सूचना केली.केसीआर आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या भ्रष्टाचाराचा सर्वाधिक फटका महिलांना बसला आहे, असा आरोप करत त्यांनी केसीआरने जेवढा पैसा लुटला, तेवढाच पैसा काँग्रेस लोकांना परत देईल.असे आश्वासनही त्यांनी दिले.राज्यात सत्तेवर आल्यानंतर महालक्ष्मी योजनेंतर्गत प्रत्येक महिलेला मासिक २,५०० रुपयांची आर्थिक मदत मिळणार आहे. स्वयंपाकाचा गॅस सिलिंडर केवळ ५०० रुपयांना पुरविला जाईल तर महिलांना आरटीसी बसमधून मोफत प्रवास करता येणार आहे. गॅस सिलिंडर आणि बस प्रवासावरील बचतीसह प्रत्येक महिलेला दरमहा ४,००० रुपयांचा लाभ मिळणार असल्याचे ते म्हणाले.बीआरएस, भाजप आणि एमआयएम एक असल्याच्या आरोपाचा पुनरुच्चार करून त्यांनी तेलंगणात लोकराज्य आणण्यासाठी काँग्रेसला सत्तेत आणण्याचे आवाहन त्यांनी केले.

## ३० नोव्हेंबरपर्यंत धान खरेदीसाठी शेतकऱ्यांना नोंदणी करण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

पणन हंगाम २०२३-२४ खरीप मधील शासकीय आधारभूत खरेदी योजनेअंतर्गत शासन निर्णयानुसार जिल्ह्यातील धान खरेदी केंद्रावर दि. ३० नोव्हेंबर २०२३ पर्यंत धान खरेदीसाठी शेतकऱ्यांची नोंदणी सुरू झालेली आहे.शेतकरी नोंदणी करताना हंगाम २०२३-२४ पासून ज्या शेतकऱ्यांचा ७/१२ आहे, त्याच शेतकऱ्याचा प्रत्यक्ष लाईव्ह फोटो अपलोड करणे आवश्यक आहे, त्याशिवाय नोंदणी पूर्ण होणार नाही. ज्या शेतकऱ्यांना शेतमालाची विक्री करावयाची आहे, त्याच शेतकऱ्याने लाईव्ह फोटो अपलोड करण्यासाठी स्वतः खरेदी केंद्रावर उपस्थित राहून दिलेल्या कालावधीत म्हणजेच, दि. ३० नोव्हेंबरपर्यंत खरेदी केंद्रावर मुदतीत धान खरेदीसाठी नोंदणी पूर्ण करावी, असे जिल्हा मार्केटिंग अधिकारी संजय हजारे यांनी कळविले आहे.मुल तालुक्यातील कृषि उत्पन्न बाजार समिती मुल, सावली तालुक्यातील सेवा सहकारी संस्था मर्या. पाथरी, श्री. किसान सह.तांदुळ गिरणी मर्या.व्याहाड (बु.), सिंदेवाही तालुक्यातील नवरगाव विविध कार्य.सह. संस्था, नवरगाव, कृषि उत्पन्न बाजार समिती सिंदेवाही, सेवा सहकारी संस्था रत्नापूर, विविध कार्य.सह. संस्था सिंदेवाही, सिंदेवाही तालुक्यातंर्गत नवरगाव सहकारी राईस मिल, नवरगाव आणि सिंदेवाही सहकारी भात गिरणी, सिंदेवाही, नागभिड तालुक्यातील तालुका शेतकी खरेदी विक्री सह.संस्था नागभिड, कृषि उत्पन्न बाजार समिती नागभिड आणि श्री. गुरुदेव सहकारी राईस मिल कोर्धा ता. नागभीड, चिमूर तालुक्यातील चंद्रपूर जिल्हा कृषि औद्यो. सहकारी संस्था, चिमूर आणि चिमूर तालुका सहकारी शेतकी खरेदी विक्री नेरी ता. चिमूर, गोंडपिपरी तालुक्यातील कोरपना ता.ख.वि.समिती गोंडपिपरी, ब्रम्हपुरी तालुक्यातील चंद्रपूर जिल्हा कृषि औद्योगिक सह. संस्था, ब्रम्हपुरी खंड सहकारी शेतकी खरेदी विक्री संस्था, चंद्रपूर जिल्हा कृषि औद्यो. सहकारी संस्था बरडकिन्ही आणि प्रगत शेतकरी शेती उपज व विक्री सहकारी संस्था कळमगाव, कृषि उत्पन्न बाजार समिती पोंभुर्णा, कृषि उत्पन्न बाजार समिती चंद्रपूर, बल्लारपूर तालुक्यातील कोरपना ता.ख.वि.समिती कोठारी ही खरेदी केंद्र आहेत.

## चंद्रपूरातील रॅन्चोंची आमदार किशोर जोरगेवार यांनी घडवली उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी भेट

### ११युवकांनी मिळून बनविली हायड्रोजन कार,सरकार करणार मदत



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्हातील११युवकांनी मिळून हायड्रोजनवर चालणारी कार तयार केली केली. या युवकांना प्रोत्साहन देण्यासाठी श्री माता महाकाली महोत्सवात त्यांची कार ठेवण्यात आली होती. तर आमदार किशोर जोरगेवार यांनी या युवकांची मुंबई येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी भेट घडवून आणली आहे. ना. फडणवीस यांनीही यावेळी युवकांचे कौतुक करत शासन त्यांना मदत करेल असा विश्वास दिला आहे. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांच्या सह कारची निर्मिती करणारे हर्षन नक्षीने,साईल काकडे,प्रज्वल जमदाडे,जय विधाते,दिपक मालेकर,वैभव मांडवकर यांची उपस्थिती होती. चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्हातील वणी येथील११युवकांनी मिळून हायड्रोजनवर चालणारी अत्याधूनीक कार तयार केली आहे. या कारमध्ये सुरक्षा संसाधनापासून सर्व लक्झरी सुविधा उपलब्ध आहे. दोन वर्षाच्या परिश्रमा नंतर स्वखर्चातून या युवकांनी ही कार तयार केली आहे. टायर आणि काच वगळता कारसाठी वापरण्यात आलेले सर्व उपकरणे त्यांनी तयार केली असल्याची माहिती या युवकांनी दिली आहे. सदर कार एक किलो हायड्रोजनवर२५०किमी चालत असल्याचा दावा या युवकांनी केला आहे. तसेच ही कार अद्यावत-खतंत्रज्ञानावर आधारित चालक विरहीत कार असल्याचेही त्यांनी सांगीतले आहे. दरम्यान आता त्यांना सदर कार रस्त्यावर उतरविण्यासाठी शासनाची मदत हवी आहे. त्यामुळे यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांनी प्रयत्न सुरु केले आहे. चंद्रपूरात आयोजित श्री माता महाकाली महोत्सवातही सदर कार ठेवण्याची संधी आमदार किशोर जोरगेवार यांनी या युवकांना उपलब्ध करुन दिली होती. यावेळी त्यांनी या युवकांचे कौतुक करत शक्य ती सर्व मदत करण्याचे आश्वासन दिले होते. तर आता त्यांनी या युवकांची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी भेट घडवून दिली आहे. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कारची पाहणी करत संपूर्ण माहिती जाणून घेतली. भारताकरिता सर्वाधिक आवश्यकता आहे अशा प्रकारचे तंत्रज्ञान या कारमध्ये वापरण्यात आले आहे. या कारमुळे प्रदुषण कमी होणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले असून या कारला रस्त्यावरती आणण्यासाठी सरकारच्या वतीने प्रयत्न केल्या जातील असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला आहे.

# रमाई घरकुल योजनेतील ३२३७ लाभार्थ्यांना मिळणार हक्काची घरे

### १२६५ त्रुटी असलेल्या घरकुलांच्या प्रस्तावालाही मिळाली मंजूरी

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांना मोठे यश

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील रमाई आवास घरकुल योजनेचे (ग्रामीण) ३२३७ लाभार्थ्यांना मंजूरी मिळाली आहे. यामध्ये १२६५ त्रुटी असलेल्या घरकुलांच्या प्रस्तावालाही मंजूरी मिळाली असून या सर्व लाभार्थ्यांना हक्काचे घरे मिळणार आहे. यासाठी राज्याचे वने व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता.त्यांच्या प्रयत्नांना मोठे यश प्राप्त झाले आहे.

रमाई घरकुल योजना (ग्रामीण) या योजनेअंतर्गत रमाई घरकुल निर्माण समितीची बैठक राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सदर निर्णय घेण्यात आला.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत शासनाने अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी घरकुल योजना सुरू केली आहे. या अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील लोकांचे राहणीमान उंचावणे, त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण व शहरी भागामध्ये त्यांच्या स्वतःच्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी पक्के घर बांधून देण्यात येते. रमाई आवास योजनेचा लाभ संबंधित लाभार्थ्यांना मिळण्यासाठी सर्व तालुक्यातील पंचायत



समित्यांचे गटविकास अधिकारी यांच्याकडून पात्र लाभार्थ्यांची यादी मंजुरीकरीता मागविण्यात आली होती.रमाई आवास योजना (ग्रामीण) करीता सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात तालुकानिहाय उद्दिष्ट देण्यात आले. यामध्ये १५ तालुक्यामध्ये एकूण लाभार्थ्यांची संख्या सुरवातीला १९७२ होती. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील अनेकांनी या योजनेकरीता अर्ज केले, मात्र घरकुलापासून ते वंचित असल्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या निदर्शनास आले. या नागरिकांना घरकुल देण्यासाठी पालकमंत्री मुनगंटीवार यांनी स्वतः पुढाकार घेतला. त्यामुळे सुरवातीला रद्द झालले १२६५ लाभार्थी रमाई घरकुल योजनेसाठी नव्याने पात्र ठरविण्यात आले. आता जिल्ह्यात एकूण ३२३७ लाभार्थ्यांना रमाई घरकुल योजनेचा लाभ मिळणार आहे.

### अशी आहे नव्याने पात्र झालेल्या लाभार्थ्यांची तालुकानिहाय संख्या :

मुल तालुक्यामध्ये रद्द ऐवजी पात्र लाभार्थी संख्या १९१, जिवती तालुक्यात २४ लाभार्थी, वरोरा ५० लाभार्थी, नागभीड १०२, राजुरा ५७, गोंडपिपरी २६१, ब्रम्हपुरी ७ लाभार्थी, कोरपना ५४, सावली तालुक्यात ३६६, पोंभुर्णा तालुक्यात ३३, भद्रावती तालुक्यात ३१ लाभार्थी तर बल्लारपूर तालुक्यात ८९ लाभार्थी असे एकुण १२६५ रद्द ऐवजी पात्र घरकुल लाभार्थ्यांची संख्या आहे.

# धाडसी निर्णय घेणाऱ्या बेडर पंतप्रधान-इंदिरा गांधी

आपल्या पित्याकडुन मोठया हिम्मतीने, आत्मविश्वासाने व युगधारणेने इतिहासाचा वारसा प्रियदर्शनीने निर्भयपणे स्विकारला आहे. काळाने मोठया कौशल्याने तिला आमच्या देशाच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र ठरविले आहे. जे कधीही पडद्याआड होऊच शकत नाही. कारण आपली भुमिका इतिहासाच्या रंगभुमीवर यथायोग्यपणे पार पाडीत असतांना अमिट असा ठसा उमटविणे ही गोष्ट सुध्दा साधी असुच शकत नाही.

१९ नोव्हेंबर १९१७ रोजी अलाहाबाद येथील 'आनंदभवन' या वास्तूत त्यांचा जन्म झाला. आजोबा मोतीलालजी 'इंदिरा' या लाडीक नांवाने पुकारायचे, तर वडील नेहरुजी त्यांना 'प्रियदर्शनी' म्हणून संबोधायचे. लहानपणापासूच स्वदेशी आणि स्वदेश यांचे प्रेम त्यांच्या मनात निर्माण झाले होते. विदेशी खेळणी, कपडे यांचा त्यांना तिटकारा होता. एकदा तर त्यांनी विदेशी कपडे होळीत टाकुन दिले. वयाच्या तेराव्या वर्षी म्हणजे १९३० साली त्यांनी आपल्या सवगडयांची वानर सेना स्थापन करुन नेत्यांचे संदेश पोहचवण्याचे काम केले. ब्रिटीशांच्या विरोधात मिरवणूका काढल्या, घोषणा दिल्या या सर्वांच्या बरोबरीने शिक्षणही चालूच ठेवले. प्रारंभी अलाहाबाद मग पुणे आणि नंतर रविंद्रनाथांच्या शांतीनिकेतन मध्ये त्यांनी शिक्षण घेतले. पुढील शिक्षणासाठी फिरोज गांधी परिचित असलेल्या हुशार आणि अन् उमद्या तरुणाच्या सांगण्यावरुन इंदिराजींना ऑक्सफोर्ड विद्यापीठात दाखल करण्यात आले. त्यात त्यांनी राज्यशास्त्र, इतिहास व अर्थशास्त्र या विषयांत प्राविण्य मिळविले. विद्यापीठाने त्यांना मानद पदवी दिली. २०१० मध्ये ऑक्सफोर्ड विद्यापीठातील १० नामांकित आशियाई पदवीधरांपैकी ऑक्साशियन म्हणुन त्यांची निवड केली. याकाळात पंडितजींनी इंदिराजींना जी पत्र पाठवली त्याद्वारे त्यांना संबंध भारताच्या इतिहासाची पुरेपूर जाणीव झाली. याच काळात हिटलरने इंग्लंडवर हल्ले चढवायला प्रारंभ केला. वातावरण चिघळत चाललेले असल्यामुळे विमानाने एकटया इंदिराजी भारतात परत आल्या. त्यांच्या साहसाचे साऱ्यांनी कौतुक केले. मागोमाग फिरोज गांधीही भारतात आले. ब्रिटेन मधील वास्तव्यात दोघांच्या भेटी नेहमी होत असंत. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस मध्ये दोघेही सदस्य होऊन राजकारणात सक्रिय झाले. वडील जवाहरलाल नेहरु, विजयालक्ष्मी आणि कृष्ण या आत्यांचा विरोध असतांनाही इंदिराजींचा २६ फेब्रुवारी १९४२ रोजी फिरोज गांधी यांच्याशी आंतरजातीय पध्दतीने विवाहबध्द झाल्या. या जोडप्याला राजीव आणि संजीव या दोन देखण्या मुलांना वाढवत त्यांनी एकीकडे नेटका संसारही केला, सोबत राजकारण होतेच. इंदिरा एक भारतीय राजकारणी आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या प्रमुख नेत्या होत्या. १९४७ ते १९६४ या काळात नेहरुंच्या पंतप्रधानपदाच्या काळात इंदिरा गांधींना प्रमुख सहाय्यक मानले जात होते आणि त्यांच्या अनेक परदेश दौऱ्यांवर त्या नेहरुंसोबत असायच्या. १९५९ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली. १९६४ मध्ये त्यांच्या वडिलांच्या मृत्यूनंतर गांधींची राज्यसभा सदस्य म्हणून नियुक्ती झाली आणि माहिती व प्रसारण मंत्री म्हणून लाल बहादूर शास्त्री यांच्या मंत्रिमंडळाच्या त्या सदस्या बनल्या. १९६६ च्या सुरुवातीला (शास्त्री यांच्या निधनानंतर) झालेल्या काँग्रेस पक्षाच्या संसदीय नेतृत्वाच्या इंदिरा गांधी नेत्या बनल्या आणि शास्त्री यांच्या मृत्यूनंतर भारताचे पंतप्रधान म्हणून त्यांची जागा घेतली. १९६६ ते १९७७ पर्यंत देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणुन मोठी भुमिका बजावली. १९६९ ला त्यांनी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. त्यांनी गरीबी हटविण्यासाठी प्रथम १० कलमी कार्यक्रम राबविला.जवाहरलाल नेहरूंच्या मृत्यनंतर लालबहादूर शास्त्री पंतप्रधान झाले. यात त्यांनी माहिती व नभोवाणीमंत्री हे पद सांभाळले. याचदरम्यान त्यावेळच्या मद्रास राज्यात हिंदीला राष्ट्रीय भाषा घोषित करण्याविरोधात दंगे उसळले होते, तेव्हा त्यांनी मद्रासला भेट दिली. शासकीय अधिकारी, सामाजिक नेते यांची भेट घेऊन राग शांत करण्याचा प्रयत्नत केला. १९६५ चे भारत-पाक युद्ध या दरम्यान त्या श्रीनगरच्या आसपास सुट्या व्यतीत करत होत्या. पाकिस्तानी सैन्य फार जवळ पोहोचले आहे असे संदेश भारतीय सैन्याकडून मिळूनही त्यांनी जम्मू अथवा दिल्ली येथे जाण्यास नकार दिला. अशा प्रकारच्या धाडसी कामांमुळे त्यांची लोकप्रिय छबी निर्माण करण्यात त्या यशस्वी झाल्या. पाकचे आक्रमण परतून लावण्यात भारताला यश आले. १९६६ च्या जानेवारी महिन्यात तत्कालीन सोव्हियत संघात ताश्कंद येथे पाकिस्तानचे अयूबखान आणि लालबहादुर शास्त्री यात शांति समझोता झाला. पण त्यानंतर काही तासातच त्यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. यानंतर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये पंतप्रधान पदासाठी स्पर्धाच सुरू झाली. मोरारजी देसाई यांनी आपला अर्ज भरला. पण तत्कालीन काँग्रेस अध्यक्ष कामराज यांनी अंतर्गत राजकारणातून इंदिरा गांधींना पाठिंबा दिला.सतत भारतावर आक्रमण करणाऱ्या भारताने १९७१ डिसेंबर ला युध्दाची घोषणा केली. पाकिस्तानच्या पूर्व बंगाल मधील गांजलेल्या प्रजेला स्वतंत्र करण्यासाठी लष्करी मदत करुन त्यांनी भारत दृष्टया पाकिस्तानचे बांग्लादेश व पाकिस्तान असे दोन तुकडे केले, बांग्लादेशची निर्मीती. तसेच या विजयामुळे दक्षिण आशियामध्ये भारताचा प्रभाव वाढला. त्यानंतर लगेच बांग्लादेशचे वंगबंधु शेख मुजबीर रेहमान म्हणुन पहिले राष्ट्रपती घोषित करण्यात आले. त्यांची सामान्य कामगिरी लक्षात घेवून राष्ट्रपती व्ही.व्ही. गिरी यांनी १९७१ मध्ये 'भारतरत्न' किताबाने सन्मानित केले. बांग्लादेशच्या उभारणीवेळी त्यांची भूमिका आणि देशाला अणुशक्ती संपन्न बनविण्याचा त्यांचा निर्णय भारताला प्रगतीपथावर नेणारा होता. त्याचप्रमाणे भारतीय वैज्ञानिकांकडुन अवकाशात उपग्रह सोडुन भारताचा जगात दबदबा निर्माण केला. २०२० मध्ये गेल्या शतकाची व्याख्या करणाऱ्या जगातील १०० शक्तिशाली महिलांमध्ये टाइम मासिकाने इंदिरा गांधींचा समावेश केला.अलिप्ततावादी प्रवृत्तींचा हवाला देत आणि क्रांतीच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून इंदिरा गांधींनी १९७५ ते १९७७ पर्यंत आणीबाणीची घोषणा केली. आणीबाणीच्या काळात मूलभूत नागरी हक्क निलंबित केले गेले आणि प्रसार माध्यमांवर निर्बंध लावले गेले. या काळात मोठ्या प्रमाणावर अत्याचार केले गेले. १९८० मध्ये मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकांनंतर इंदिरा गांधी या पुन्हा सत्तेवर आल्या.२०११ मध्ये इंदिरा गांधींना बांग्लादेशच्या मुक्तिसंग्रामातील त्यांच्या 'उत्कृष्ट योगदानासाठी' बांग्लादेश स्वाधीनता सन्मान हा बांगलादेशचा सर्वोच्च नागरी पुरस्कार मरणोत्तर बहाल करण्यात आला. अमेरिकन दबाव असताना देखील पाकिस्तानला पराभूत करून पूर्व पाकिस्तानचे स्वतंत्र बांगलादेशात रूपांतर करणे हा इंदिरा गांधींचा मुख्य वारसा खंबीरपणे उभा आहे. इंदिरा गांधी यांच्यामुळेच भारत हा अण्वस्त्रधारी देशांच्या गटात सामील होऊ शकला. भारत हा अधिकृतपणे अलिप्ततावादी चळवळीचा भाग असूनही, त्यांनी भारतीय परराष्ट्र धोरणाला सोव्हिएत गटाकडे झुकवले. १९९९ मध्ये बीबीसीने आयोजित केलेल्या ऑनलाइन सर्वेक्षणात वुमन ऑफ द मिलेनियम असा इंदिरा गांधींचा गौरव केला गेला. २०१२ मध्ये आउटलुक इंडियाच्या महान भारतीयांच्या सर्वेक्षणात त्या सातव्या क्रमांकावर होत्या. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत काँग्रेस पक्ष ही 'ब्रॉड चर्च' मानली जात होती; तथापि, आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधींच्या कुटुंबाने नियंत्रित केलेल्या कौटुंबिक फर्ममध्ये काँग्रेसचे रूपांतर होऊ लागले. ही कुटुंबाप्रती निष्ठा नंतर गांधी कुटुंबातील सदस्यांच्या वंशपरंपरागत सत्तेत बदलत गेली. त्या हतबल झाल्या नाहीत. उलट त्या टिकेला सामोरे गेल्या. धाडसी व्यक्तिचं असंच असतं, ते कशाचीही तमा करीत नाही. इंदिरा गांधी यांच्या असुरक्षिततेच्या भावनेमुळे कार्यकारिणीपासून न्याय व्यवस्थेपर्यंत भारताच्या सरकारच्या सर्व भागांमध्ये पद्धतशीर भ्रष्टाचार हा देखील त्यांचा वारसा असल्याचे काही लोक टीका करतात. आणीबाणीच्या काळात स्वीकारण्यात आलेली भारतीय राज्यघटनेची ४२ वी घटना दुरुस्ती देखील इंदिरा गांधी यांच्या वारशाचा भाग मानली जाऊ शकते. न्यायालयीन आव्हाने आणि बिगर काँग्रेस सरकारने या दुरुस्तीवर पाणी टाकण्याचा प्रयत्न केला असला तरी ही दुरुस्ती अजूनही कायम आहे. मारुती उद्योग कंपनीची स्थापना इंदिरा यांचे पुत्र संजय गांधी यांनी प्रथम केली असली, तरी इंदिरांच्या काळात ही राष्ट्रीयीकृत कंपनी प्रसिद्ध झाली. आजही ती नांवरुपास आलेली आहे.भारता सारख्या खंडप्राय देशाच्या दिर्घकाळ पंतप्रधान राहिलेल्या त्या एकमेव नेता होत्या. स्वातंत्र्य चळवळीत झोकून देणारी आणि देश स्वतंत्र झाल्यावर त्यांच्या विकासासाठी अविरत झटणारी त्यांच्या सारखी स्त्री पंतप्रधान तर शोधूनही मिळायची नाही. ३० ऑक्टोबर १९८४ रोजी त्यांनी केलेल्या एका भाषणात त्या म्हणाल्या होत्या माझ्या देशाची सेवा करतांना मला मृत्यु आला तर मला त्याचा अभिमानच वाटेल, माझ्या रक्ताचा थेंब अन्थेंब मी या देशाच्या वैभवासाठी आणि विकासासाठी खर्च करीन आणि हा देश बलवान आणि चैतन्यदायी बनवेन ३१ ऑक्टोंबर १९८४ रोजी सकाळी काळाने त्यांच्याच अंगरक्षकाने त्यांच्यावर भ्याड गोळयांचा वर्षाव करुन त्यांची हत्या केली व एकथोर साहसी स्त्री अखेर हुतात्मा झाली. एक तेजपुंज व्यक्तिमत्व लोप पावले, सारा भारत सुन्न झाला. जग या घटनेने अचंबित झाले. त्या गेल्या पण त्यांचे उत्तुंग व्यक्तीमत्व आजही भारतीयांच्या मनावर कोरले गेले आहे. त्यांच्या ३९ व्या स्मृतिदिना निमित्त शतशः प्रणाम !





प्रविण बागडे
९९२३६२०९१९

# जानेमन तुम कमाल करते हो!

जवळपास एक वर्षापूर्वी टी ट्वेंटी विश्वचषक २०२२च्या उपांत्य लढतीत इंग्लंडने टीम इंडियाचा दहा विकेट्सनी धुव्वा उडवला होता. अर्थातच रोहीत ॲंड कंपनीला हा हिशोब चुकता करायला या एकदिवसीय विश्वचषकात नामी संधी चालून आली आणि त्यांनी त्या पराभवाचा पुरेपूर वचपा काढला आहे. इंग्लिश संघाच्या दहा विकेट्स घेत भारतीय संघाने तब्बल शंभर धावांनी बटलर कंपनीला सडेतोड उत्तर दिले आहे. बॅझबॉलच्या गुर्मीत वावरणाऱ्या इंग्लिश संघाला अवघ्या १२९ धावांत नेस्तनाबूत करत टीम इंडियाने आपला बदला पुर्ण केला आहे. झाले काय तर लखनौची खेळपट्टी अत्यंत नखरेल होती. विशेषतः गोलंदाजांच्या प्रेमात होती तर फलंदाजांना चकवणारी होती. बॅकफूट असो फ्रंट फूट, फलंदाजांना दोन्ही जागी डोळे फाडून संयम राखून फलंदाजी करणे अपेक्षित होते. त्यातच इंग्लिश संघाचे वेगवान असो की फिरकी गोलंदाज असो, टिच्चून गोलंदाजी करत असल्याने फलंदाजांची अवस्था माय जेवू घालत नाही, बाप भीक मागू देत नाही अशी होती. त्यातही आतापर्यंतच्या पाच सामन्यात धावांचा पाठलाग केल्याने पहिले लक्ष्य निर्धारित करणे थोडं अवघडच होतं. ज्याप्रकारे ख्रिस वोक्सने शुभमनला उडवले ते पाहता आपल्या संघाची दहीहंडी लवकरच फुटेल अशी शंकेची पाल चुकचुकली होती आणि झालेही तसेच.या स्पर्धेत अजेय योद्धा म्हणून नावलौकिक असलेल्या विराटची धावबंदी करताच तो हाराकिरी करून बसला. भारतीय संघाची सध्या चौथ्या क्रमांकाचा फलंदाज हा सर्वात कमजोर बाब आहे. आतापर्यंत आपण आलू से सोना ऐकले होते पण श्रेयस अय्यर कडे पाहता सोन्या सारख्या संधीचे माती करण्याचे श्रेय त्याला नक्कीच द्यावे लागेल. श्रेयसने आखूड टप्प्याच्या चेंडूवर हुकूमत नाही गाजवली तर छोटी हाईट बीग फाईट असलेला ईशान किशन कधीही त्याला खो देऊ शकतो. ४० धावांत तीन बाद ही खरोखरच वाईट स्थिती होती. मात्र अनुभवी रोहीत, राहुलने धीरे धीरे स्कोअर को बढाना है, हद से गुजर जाना है चालू केले होते.दोघांनी ९१ धावांची बहुमूल्य भागिदारी केली मात्र समोर विली दिसताच राहुलचा संयम सुटला. विलीच्या चेंडूने थोडी उसळी घेताच राहुल फसला. केवळ सहा फलंदाज असल्याने भारतीय गोटात चिंतेचे वातावरण होते. मात्र पुन्हा एकदा रोहीतने सूर्यासोबत २५ धावा जोडत आशा पल्लवीत केल्या होत्या. एकेक मोती गळत असतांना रोहीतने कर्णधाराची खेळी करताना संयम आणि साहसी फलंदाजीचे उत्तम उदाहरण दाखवून दिले. रोहीत शतकाला गवसणी घालेल असे वाटतांनाच त्याची घालमेल झाली आणि तो परतला. एव्हाना सूर्या स्थिरावला होता आणि जडेजा सोबत कमीतकमी अडीचशेचा टप्पा गाठून देईल असे वाटत होते. मात्र जडेजा बाद झाला आणि मोठ्या धावसंख्येचे लक्ष्य लोप पावले. अखेर सूर्याने मावळण्याच्या पहिले कमालीची फलंदाजी करून आपल्या पाठीराख्यांच्या जीवात जीव आणला.पन्नास षटकांत २३० धावा आणि ते सुद्धा फलंदाजीत प्रचंड खोली असलेल्या इंग्लिश संघाविरुद्ध म्हणजे ऊंट के मुंहमे जीरा सारखे होते. त्यातही भारतीय संघाला जुना बदला घेऊन, किसी दिन ये तमाशा मुस्कूरा कर हम भी देखेंगे हे दाखवायचे होते. मात्र २३० धावांची राखण करणे म्हणजे नंगा नहायेंगा क्या और निचोडेंगा क्या सारखे कठीण होते. समाधानाची बाब म्हणजे ढालगज बुमराह आणि शार्प शुटर शमी सध्या तुफान फॉर्मात असल्याने कांटे की टक्कर होण्याची शक्यता होती. खरेतर मो. शमी आणि कुलदीप यादव हे दोघेही मुल्यवान परंतु उपेक्षितच होते. मात्र या दोघांनी जबरदस्त कमबॅक दाखवत आपली निवड सार्थ ठरवली होती.प्रत्युत्तरादाखल इंग्लंडने कोणतीही दयामाया न दाखवता हल्ले सुरू केले होते. विशेषतः सिराजला त्यांनी लक्ष केले. पण पाचव्याच षटकांत बुमराहने इंग्लिश संघाचा पाया खचवला. खतरनाक डेव्हिड मलान आणि जो रूटला मुळापासून उपटून त्याने आपल्या संघाला झक्कास सुरुवात दिली. लगेच रोहीतने आपल्या निर्णय क्षमतेची चुणूक दाखवत मो.शमीला आक्रमणाला लावले. कारण रोहीत जाणून होता, मधुबन खुशबू देता है और शमी विकेट लेता है. शमीने सध्या जी यष्ट्यांची तोडफोड चालवली आहे ते पाहता तो मागच्या जन्मी लाकूडतोड्या असल्याची खात्री पटते. त्याने इंग्लिश संघाचा कणा असलेल्या बेन स्टोक्स, जॉनी बेअरस्टोला आपल्या धारदार, वेगवान गोलंदाजीने कापून काढले. चार बाद एकोणचाळीस धावसंख्या असतांना कुलदीप आला आणि जोस बटलरचा त्याने घास घेतला. ज्याप्रकारे कुलदीपने तो चेंडू वळवला ते पाहता जशी मावळत्या उन्हांत केवड्याच्या वनांत नागीण सळसळली असे म्हणावेसे वाटते.अवघ्या बावन्न धावांत अर्ध्या इंग्लिश संघाचा खुर्दा उडवत भारतीय संघाने सामन्यावर जबरदस्त पकड घेतली होती. मात्र अजूनही त्यांच्याकडे मोईन अली, लीयम लिविंगस्टोन, वोक्स, रशीद खान आणि वुड सारखे अष्टपैलू खेळाडू असल्याने आपल्या गोलंदाजांना उसंत घेऊन चालणार नव्हते. पण अर्धा संघ तंबूत परतल्याने इंग्लिश संघाचा धीर खचला होता. तसेच शमी, जडेजा, कुलदीप आणि बुमराहने नाड्या आवळल्याने इंग्लिश संघाची तडफड वाढली होती. मुख्य म्हणजे त्यांचा कोणताही फलंदाज धावांची तिशी गाठू शकला नाही. केवळ तीस धावांच्या दोन भागिदाऱ्या इंग्लिश संघाला तारू शकल्या नाहीत.टीम इंडियाची या विश्वचषकात वाटचाल पाहता गोलंदाजांची कामगिरी नजरेत भरणारी आहे. जेंव्हा जेंव्हा बळींची गरज भासली तेव्हा तीळा तीळा दार उघड सारखे आपल्या गोलंदाजांनी बळी घेत विजयाचे दार उघडून दिले आहे. गोलंदाजांच्या प्रयत्नांना यष्टीरक्षक म्हणून केएल राहुलचे योगदान विसरता येत नाही. क्षेत्ररक्षणाचे काही अपवाद वगळता बरीच सुधारणा झाली आहे. या सामन्यात सूर्याची बॅट तळपल्याने दोनशेचा टप्पा सहज ओलांडला गेला. मात्र शुभमन, विराट, श्रेयस आणि राहुलने महत्वाच्या क्षणी बेजबाबदार फटके मारल्याने संघ अडचणीत आला होता. अखेर फलंदाजांच्या चुकांवर पांघरूण घालत आपल्या गोलंदाजांनी सामना इंग्लंडच्या जबड्यातून खेचून आणला आहे. निश्चितच या सामन्यातील आपल्या गोलंदाजांची नेत्रदीपक कामगिरी पाहता, जानेमन तुम कमाल करते हो असे म्हणावेसे वाटते.







डॉ.अनिल पावशेकर
मो.९८२२९३९८७

# उपसरपंचासह सदस्यांचा मासिक सभेवर बहिष्कार




**वरोरा । प्रतिनिधी**

मागील महिन्यातील मासिक सभा संपून १ महिन्याचा कालावधी लोटूनही घेतलेल्या निर्णयाची पूर्तता न झाल्याने संतप्त ग्रामपंचायत सदस्यांनी ३० ऑक्टोबर रोज सोमवारला घेण्यात येणाऱ्या मासिक सभेवर बहिष्कार टाकला .

मागील महिन्यातील मासिक सभा संपून १ महिन्याचा कालावधी पूर्ण झाला असून मागील सभेत घेतलेल्या ठरावाची पूर्तता पूर्ण पणे झाली नाही .मागील मासिक सभेत घेतलेल्या ठरावाची पूर्तता होत नसेल तर मासिक सभा घेण्यात काहीच अर्थ नाही . ग्रामपंचायत हि एक स्थानिक स्वराज्य संस्था असून या माध्यमातूनच गावातील लोकांच्या समस्यांचे निवारण केले जाते . परंतु मासिक सभेत गावाच्या विकासासाठी तसेच इतर कामांबाबत मासिक सभेत चर्चा करून ठराव घेण्यात आले . परंतु या ठरावाची पूर्तता अद्यापही करण्यात आली नाही .त्यामुळे आम्हाला प्रश्न पडला आहे कि ग्रामपंचायत मध्ये मासिक सभेला उपस्थित राहून घेतलेल्या ठरावाची पूर्तता होत नसेल तर मासिक सभा घ्यायची कशाला आणि आपण ठरावाची पूर्तता करणार नसाल तर तो न करण्यामागे आपला हेतू किंवा उद्देश काय .हाही प्रश्न आम्हाला पडला असल्याचे बहिष्कार टाकलेल्या उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांनी सरपंच व ग्रामसेवकांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे . त्यामुळेच आम्ही बहिष्कार टाकत असल्याचे म्हटले आहे . तसेच मागील मासिक सभेत झालेल्या ठरावाची पूर्तता करूनच नवीन मासिक सभा बोलवा असे हि निवेदनातून म्हटले आहे . मासिक सभेवर बहिष्कार टाकणाऱ्या सदस्यांमध्ये राहुल ठेंगणे उपसरपंच , आ . मु वानखेडे , ग्रामपंचायत सदस्य बोर्डा , र . म देसाई ग्रामपंचायत सदस्य बोर्डा , प्रि. व्ही भोयर ग्रामपंचायत सदस्य , प्र. अ जीवतोडे, भाग्यश्री इंगळे ग्रामपंचायत सदस्य , गोपिका परचाके ग्रामपंचायत सदस्य , नंदा हिवरकर ग्रामपंचायत सदस्य यांचा समावेश आहे .

# जिल्ह्यात अंमली पदार्थ विरोधी मोहीम अधिक व्यापक करा – जिल्हाधिकारी विनय गौडा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये अंमली पदार्थांचे सेवन अधिक प्रमाणात होऊ शकते. याकरीता शिक्षण विभागाने शाळा व महाविद्यालयांमध्ये अंमली पदार्थाचे प्रतिबंध व दुष्परिणामाबाबत जनजागृतीपर उपक्रम राबवावेत. तसेच जिल्ह्यात संबंधित यंत्रणांनी अंमली पदार्थ विरोधी मोहिम अधिक व्यापक करावी, अशा सुचना जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयातील वीस कलमी सभागृह येथे जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.



बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, सहाय्यक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम.,अपर पोलिस अधीक्षक रीना जनबंधू, उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, सहाय्यक पोलिस निरीक्षक चत्तरकर, अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त वाने, उपशिक्षणाधिकारी निकिता ठाकरे, डाक निरीक्षक एस. दिवटे, केंद्रीय वस्तू व सेवा कर विभागाचे विजयकुमार नायर आदी उपस्थित होते.जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाले, शिक्षण विभागामार्फत शाळा व महाविद्यालयांमध्ये मागील महिन्यात, चालू महिन्यात व यापुढे किती जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित केले जाणार आहे, याबाबत नियोजन ठेवावे. त्यासोबतच गोंडवाना विद्यापीठ तसेच विद्यापीठाच्या अखत्यारीत येणाऱ्या प्रत्येक महाविद्यालयात अंमली पदार्थाच्या दुष्परिणामाबाबत जनजागृतीपर कार्यक्रम राबविणे तसेच महाविद्यालयात नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत कळवावे. एमआयडीसीने त्यांच्या क्षेत्रातील बंद पडलेल्या युनिटची माहिती घ्यावी. सदर युनिटची यादी तयार करून पोलिसांना द्यावी. अन्न व औषध प्रशासन विभागाने एमआयडीसी क्षेत्रातील युनिटला पोलिसांच्या सहकार्याने भेटी द्याव्यात. तसेच जे कारखाने बंद आहेत त्यावर विशेष लक्ष ठेवण्याचे निर्देश दिले.ते पुढे म्हणाले, कृषी तसेच वनविभागाने जिल्ह्यात खसखस किंवा गांजा पिकांची अवैध लागवड होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. डाक विभागाने डार्कनेट व कुरीअरच्या माध्यमातून अंमली पदार्थाची मागणी व पुरवठा होणार नाही याकडे लक्ष द्यावे. त्यासोबतच दैनंदिन पार्सलचे नियमित स्कॅनिंग करून तपासणी करावी. ड्रग्स मॅन्युफॅक्चर होऊ नये, याबाबत अन्न व औषध प्रशासनाने दक्षता घ्यावी. मेडिकल स्टोअर्समध्ये सीसीटीव्ही लावण्याबाबत सक्त निर्देश द्यावे, सीसीटीव्ही नसल्यास नियमानुसार कार्यवाही करावी.आरोग्य विभागाकडे ड्रग्सबाबत कौन्सिल करण्यासाठी काउन्सलर नेमावे. तसेच वनविभागाच्या वनजमिनीवर गांजा व खसखसची लागवड होत असल्यास वनविभागाने याबाबतची माहिती द्यावी, असेही ते म्हणाले. यावेळी त्यांनी पोलिस विभागामार्फत अंमली पदार्थासदंर्भात करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती जाणून घेतली.

सह्याद्रीचा राखणदार



# शेतकऱ्यावर वाघाचा हल्ला ; ६५ वर्षाच्या शेतकऱ्याची यशस्वी झुंज

## हातात धान कापणीचे अवजार ; सामोर डरकाळी फोडणारा वाघ

**गडचिरोली । प्रतिनिधी**

गडचिरोली जिल्ह्यात सध्या वाघ आणिरानटी हत्तींचा धुमाकूळ सुरू आहे. गडचिरोलीच्या उत्तर भागात या दोन्ही प्राण्यांमुळे नागरिक सध्या भयभीत झाली असतानाच दक्षिण भागात सुद्धावाघांची दहशत बघायला मिळत आहे. शेतात काम करणारे शेतकरी आणि मजूरवर्ग दर दिवसाला वाघाच्या दहशतीखाली काम करत आहेत. गुरुवारीसकाळच्या सुमारास एका शेतकऱ्यावर वाघाने असाचहल्ला केला. मात्र, त्या ६५ वर्षीय धाडसी शेतकऱ्याने मोठ्या हिमतीने या वाघाचा प्रतिकार करुन त्याला परतावून लावला. रंजित कुटेश्वर मंडल (रा.विश्वनाथनगर, ता. मुलचेरा) असं त्या शेतकऱ्याचे नाव असून वाघासोबत झुंज देताना ते जखमी झाला असून त्यांच्यावर सध्या ग्रामीण रुग्णालय मुलचेरा येथे उपचार सुरू आहेत.





मुलचेरा तालुक्यात मागील काही दिवसांपासून वाघाची प्रचंड दहशत सुरू असून तालुक्यातील देशबंधूग्राम गावालगत असलेल्या वनविकास महामंडळाच्या जंगल परिसरात वाघाने २७ ऑक्टोबर रोजी देशबंधूग्राम येथील खितीस रॉय यांच्या मेंढीवर हल्ला करत ठार मारला. तर २८ ऑक्टोबर रोजी वनविकास महामंडळाच्या खंड क्रमांक १७३ मध्ये देशबंधूग्राम येथील विष्णू मंडल यांच्या गाईचा फडशा पाडला. या घटनेची माहिती माहिती मिळताच वन विभाग व वनविकास महामंडळाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोका पंचनामा करून गावात बॅनर लावत वाघापासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे. तर जंगलात विभागाने ट्रॅपिंग कॅमेरे बसवून वाघाच्या हालचालीवर नजर ठेवली होती. असे असले तरी वाघ तालुका मुख्यालय जवळील विविध गावांच्या शेतशिवारात भ्रमण करून पाळीव प्राण्यांना भक्ष्य व जखमी करत आहे. त्यामुळे मुलचेरा तालुक्यात वाघाची दहशत निर्माण झाली आहे.विशेष म्हणजे गुरुवारी सकाळी ९.३० वाजताच्या दरम्यान रंजित कुटेश्वर मंडल नामक शेतकरी आपल्या विश्वनाथनगर गावातील शेतात धान कापणी करताना अचानक वाघाने डरकाळी फोडली. ते घाबरून जाऊन आपल्याच शेतातील आंब्याच्या झाडावर चढायला गेले असता वाघाने त्यांच्यावर हल्ला केला. कसेबसे ते झुंज देत झाडावर चढताना त्यांच्या दोन्ही पायावर वाघाने पंजे मारत जखमी केले. आजूबाजूला असलेल्या लोकांनी धाव घेताच वाघाने पळ काढला. मात्र, रंजित मंडल या शेतकऱ्याच्या दोन्ही पायाला गंभीर व खोलवर जखम झाल्याने त्यांना मुलचेरा येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले असून सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिली.एवढेच नव्हे तर तर १ नोव्हेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास देशबंधूग्राम येथील एका गाईवर वाघाने हल्ला केला होता. परत २ नोव्हेंबर गुरुवारला शेतकऱ्यांवर वाघाने हल्ला केल्याने या परिसरात नेमके किती वाघ आहेत? वाघ आहे की वाघीण आहे? असे प्रश्न परिसरातील नागरिकांकडून उपस्थित केले जात आहे. भर दिवसा घडत असलेल्या अशा घटनांमुळे या भागातील शेतकऱ्यांमध्ये प्रचंड दहशत निर्माण झाली असून शेतीचे कामे ठप्प झाली आहेत.आलापल्ली वन विभाग अंतर्गत येत असलेल्या वनपरिक्षेत्र कार्यालय पेडीगुडम तसेच वनविकास महामंडळ कार्यालय, वेलगुर या दोन्ही क्षेत्रात वाघांचा वावर होता. याच क्षेत्रात गाई आणि मेंढीला वाघाने ठार केले होते. तर काल बुधुवार रोजी सायंकाळच्या सुमारास वाघाने परत याच परिसरात एका गोऱ्यावर हल्ला केला. त्यामुळे दोन्ही कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी ट्रॅप कॅमेरे बसवून गस्त घालत होते. मात्र, गुरुवारी सकाळच्या सुमारास शेतकऱ्यावर झालेला हल्ला हा मार्कंडा वनपरिक्षेत्रातील रेंगेवाही उपक्षेत्रात खंड क्रमांक १५२५ मध्ये झाला. त्यामुळे आता मार्कंडा वनपरिक्षेत्रातील अधिकारी आणि कर्मचारी सुद्धा कामाला लागले असले तरी विविध चर्चांना उधाण आले आहे.मागील काही दिवसांपासून मुलचेरा तालुक्यातील विविध गावात वाघाचे दर्शन होत आहे. वनविभागाने ट्रॅप कॅमेरे बसवले असले तरी वाघ काही माघार घेईना, अशीच अवस्था झाली आहे. सद्या पाळीव प्राण्यावर व माणसांवर हल्ले होत असून सुद्धा वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा नागरिकांकडून आरोप केला जात आहे. पाळीव प्राण्यांवर हल्ला करत आता वाघाने माणसांवरही हल्ले करायला सुरुवात केले आहे. शेतकऱ्यांसोबतच शालेय विद्यार्थीही भयभीत झाले आहे. त्यामुळे वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्वरित लक्ष देऊन वाघाचा बंदोबस्त करावा अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.

# एकसंघ समाजाची प्रगती कोणीही रोखू शकत नाही

## राजे अम्ब्रीशराव आत्राम

### अहेरी येथे कुणबी समाजाचा स्नेहमिलन सोहळा





**अहेरी । प्रतिनिधी**

समाजात एकता व संघटितपणा असल्यास, त्या समाजाची प्रगती व विकास कोणीही रोखू शकत नाही व समाजाचा सर्वांगीण विकास होतो.असे प्रतिपादन करित कुणबी समाज भवनासाठी भरीव मदत करण्याची ग्वाही माजी राज्यमंत्री राजे अम्ब्रीशराव आत्राम यांनी दिली.अहेरी येथील राजे धर्मराव कृषी विद्यालयाच्या प्रांगणात रविवार, २९ ऑक्टोबर रोजी अखिल कुणबी समाजाच्या वतीने कोजागिरीनिमित्त स्नेहमिलन सोहळा व समाजातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार समारंभ पार पडला. यावेळी ते उद्घाटक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी जि.प.च्या - माजी अध्यक्ष आशा पोहणेकर होत्या. सत्कारमूर्ती म्हणून राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त जयश्री खोंडे, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त चंद्रपूर येथील परिचारिका पुष्पा पाचभाई, दिनकर जीवतोडे, वामन देवाळकर, विठ्ठल नागापुरे, महादेव मस्की, जीवनराव गोंडे, प्रमुख अतिथी म्हणून कुमार अवधेशरावबाबा आत्राम, पोलीस उपनिरीक्षक करिष्मा मोरे, प्रा. डॉ. संतोष डाखरे आदी उपस्थित होते. तत्पूर्वी, समाजाच्या वतीने राजे अम्ब्रीशराव आत्राम यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सत्कारमूर्तीसह इयत्ता दहावी व बारावीतील गुणवंतांचा गौरव करण्यात आला.कार्यक्रमादरम्यान, राजे विश्वेश्वरराव महाविद्यालय भामरागडचे प्रा. डॉ. संतोष डाखरे यांच्या 'विश्वातील अपरिचित देश आणि भारत' या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. प्रास्ताविक प्रवीण बुराण यांनी केले. संचालन जीजा गोहोकर तर आभार मारोती गौरकर यांनी मानले. यशस्वीतेसाठी आशा पोहणेकर, दिवाकर वाघमारे, प्रवीण बुरान, यादव धानोरकर, मारोती गौरकर, मारोती पिपरे, प्राचार्य अनिल भोंगळे, गिता जीवतोडे, शालिक म्हशाखेत्री, घनमाला जामुनकर आदींसह समाजबांधवांनी सहकार्य केले.

# पोलिस खबऱ्या असल्याच्या संशयावरून नक्षल्यानी केली तिघांची केली हत्या

**गडचिरोली । प्रतिनिधी**

गडचिरोली पोलिसांचे खबरी असल्याच्या संशयावरून छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्यांनी केली तिघांची हत्या.गडचिरोली जिल्ह्याच्या एटापल्ली तालुक्याच्या सीमेलगत छत्तीसगडमधील छोटेबेठिया पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना २ नोव्हेंबरला उघडकीस आली.



गडचिरोली पोलिसांचे खबरी असल्याच्या संशयातून तीन व्यक्तींची नक्षलवाद्यांनी हत्या केल्याची खळबळजनक घटना २ नोव्हेंबरला छत्तीसगडमध्ये उघडकीस आली. जिल्ह्याच्या सीमेवरील छत्तीसगडमधील कांकेर जिल्ह्याच्या छोटेबेठियापोलीस ठाण्याच्या हद्दीत हे थरारक हत्याकांड घडले.कुल्ले कतलामी (३५), मनोज कोवाची (२२) व डुग्गे कोवाची (२७, सर्व रा. मोरखंडी जि.कांकेर) अशी हत्या झालेल्या व्यक्तींची नावे आहेत.घटनास्थळी पोलिसांना नक्षलवाद्यांचे पत्रक आढळून आले. त्यात हे तिघे महाराष्ट्र पोलिसांचे खबरी असल्याचा दावा केला आहे. गडचिरोलीतील नक्षलविरोधी अभियानच्या सी-६० पथकासाठी हे तिघे खबरी म्हणून काम करत होते, असा संशय होता. छत्तीसगडमध्ये विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून २ नोव्हेंबरला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा कांकेर जिल्ह्यात नियोजित प्रचारदौरा होता. त्याआधीच माओवाद्यांनी तिघांची हत्या केल्याने एकच खळबळ उडाली. छत्तीसगड पोलिसांनी या हत्याकांडाबाबत तपास सुरू केला असून पंतप्रधानांनी कडक सुरक्षा यंत्रणेत नियोजित प्रचारदौरा केला. यावेळी फेरी काढून त्यांनी सभेला संबोधित देखील केले.

# कार्पेट निर्मिती केंद्राला जिल्हाधिकारी यांची भेट;बचत गटाच्या महिलांशी संवाद

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

'चांदा ते बांदा' या योजनेअंतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ, चंद्रपुरद्वारे मूल येथील औद्योगिक वसाहतीत नवतेजस्विनी कार्पेट निर्मिती केंद्राचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. २२०० चौ.मी. क्षेत्रावर नव्यानेच बांधण्यात आलेल्या इमारतीला जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी भेट देऊन पाहणी केली. सोबातच सावली येथील कार्पेट निर्मिती केंद्रालासुध्दा त्यांनी भेट देऊन येथे काम करणाऱ्या महिला बचत गटातील कारागिरांशी संवाद साधला.



काही दिवसातच मुल औद्योगिक वसाहतीत कार्पेट निर्मिती केंद्र सुरू होणार असून येथे अंदाजे २०० महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहेत. बचत गटातील महिला शेतकाम किंवा शेतमजुरी करत होत्या, त्यांना कुशल कारागीर म्हणून यश प्राप्त झाले असून या महिलांसाठी लोकर संशोधन संघ, मुंबई हे तांत्रिक सल्लागार म्हणून कार्य करीत आहेत. महिला आर्थिक विकास महामंडळ, चंद्रपुर यांच्याकडे मुल औद्योगिक परिसरात याच ठिकाणी महिलांच्या निवासी प्रशिक्षाणाकरिता महिला बचत भवन बांधकाम प्रस्तावित करण्यात आले आहे. यावेळी माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी प्रदिप काठोळे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दीपक बानाईत, तहसीलदार (मूल) रविंद्र होळी, विजय पवार (चंद्रपुर), परिक्षीत पाटील (सावली), लोकर संसोधन संघाचे संचालक शिशीर त्यागी, लेखाधिकारी नरेंद्र बनकर, अमित चवरे व प्रविण बावने उपस्थित होते.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेच्या अंमलबजावणीबाबत आढावा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

केंद्र शासनाचीप्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना ही महत्वकांक्षी योजना आहे. जिल्हयात या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील वीस कलमी सभागृहात आढावा बैठक पार पडली.

बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पालकमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी डॉ. विजय इंगोले, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त भैय्याजी येरमे, जिल्हा उद्योग केंद्राच्या व्यवस्थापक पायघन, जिल्हा अग्रणी प्रबंधक प्रशांत धोंगळे, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी श्री. इंगळे तसेच डॉ. मंगेश गुलवाडे, सीएससी सेंटरचे जिल्हा समन्वयक स्वप्नील सोनटक्के व रमझान आदी उपस्थित होते.जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाले, प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना ही महत्वकांक्षी योजना असून पारंपारिक उद्योजकांचा विकास साधण्याकरीता ग्रामसेवक व सरपंचांनी जास्तीत जास्त पारंपारिक कारागिरांची ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करावी. तसेच योजनेच्या प्रचार-प्रसारासाठी गावपातळीवर दवंडी देऊन, बॅनरच्या माध्यमातून सदर योजना जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंतपोहचविण्यासाठीकार्यवाही करावी.तसेचऑनलाईन सामूहिक सुविधा केंद्राच्या माध्यमातून जास्तीत जास्त नोंदणी करण्याबाबतच्या सूचनाहीबैठकीत देण्यात आल्या.



प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना:योजनेची उद्दिष्टे :कारागीर यांना विश्वकर्मा म्हणून मान्यता देणे,त्यांचे कौशल्य वाढविण्यासाठी कौशल्यवृध्दी प्रदान करणे,व्यवसाय आणि योग्य प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे,चांगल्या आणि आधुनिक साधनांसाठी सहाय्य प्रदान करणे,विनातारण आणि सवलतीच्या व्याजदरात सहज कर्ज उपलब्ध करुन देणे,डिजिटल व्यवहारासाठी प्रोत्साहन देणे,ब्रँड प्रमोशन आणि मार्केट लिंकेजसाठी एक व्यासपिठ प्रदान करणे,जेणेकरून, त्यांनाव्यवसाय वाढीसाठी नवीन संधी मिळणे सोईचे होईल, आदी या योजनेची उद्दीष्टे आहे.योजनेमधून नोंदणीकृत कारागिरांना मिळणारे लाभ:पारंपारीक कारागीर म्हणुन शासनमान्यता प्रमाणपत्र आणि ओळखपत्राव्दारे विश्वकर्माम्हणून मान्यता मिळेल.कौशल्य विकास (प्रशिक्षण),कौशल्य पडताळणीनंतर ५ ते ७ दिवस (४०तास) मुलभत प्रशिक्षण,इच्छुक उमेदवारास १५ दिवस प्रगत प्रशिक्षण,दररोज ५००रुपयेप्रशिक्षण विद्यावेतन आणि टुलकिट प्रोत्साहन म्हणून १५हजाररुपये अनुदान देय राहील. योजनेचे लाभार्थी:असंघटीत क्षेत्रात स्वंयरोजगार तत्वावर हात-अवजाराने काम करणारे कारागीर,१८ कुंटुंब-आधारीत पारंपारीक व्यवसायापैकी एका व्यवसायात गुंतलेला कारागीर, नोंदणीच्या तारखेस लाभार्थ्याचे वय किमान १८ वर्ष असावे. योजनेतंर्गत नोंदणी आणि लाभकुटुंबातील एका सदस्यापुरते मर्यादित राहतील. शासनसेवेत असलेली व्यक्ती आणि त्यांचेकुटुंबीय या योजनेसाठी पात्र ठरणार नाही.पात्र कारागीर आणि व्यवसाय:सुतार/बोट निर्माता, लोहधातू, ब्राँझ, पितळ, तांबे, डायस, भांडी,मूर्ती बनविणारा, लोहार/हॅमर आणि टुलकिट मेकर, कुलुप बनविणारा, मुर्तिकार, स्टोन ब्रेकर, सोनार, कुंभार, मोची, शुस्मिथ, पादत्राणे कारागीर, गवंडी, ईतर जसे बास्केट, मॅट, झाडु निर्माता, काथ्याचा व्यवसाय करणारे, बाहुली आणि खेळणी निर्माता, न्हावी, माळी, परिट, शिंपी आणि मासेमारी जाळी बनविणारे या योजनेस पात्र आहे.ऑनलाईन अर्ज पध्दती:योजनेतंर्गत लाभासाठी लिंक उपलब्ध करून देण्यात आली असून अर्ज करण्यासाठी अर्जदाराला जवळच्या ग्रामपंचायतसी.एस.सी. केंद्रातून अर्ज करावा लागेल. युजर आयडी आणि पासवर्डव्दारे लॉगीनकरून योजनेच्या लाभासाठी अर्ज करावा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असणाऱ्या समितीने मान्यता दिल्यानंतर शासनाकडून कारागीरांना ओळखपत्र देण्यात येईल व तदनंतर कारागीराला या योजनेचा लाभ मिळण्यास सुरुवात होईल.आवश्यक कागदपत्रे: लाभार्थ्याच्या नोंदणीसाठी आधारकार्ड, मोबाईल क्रमांक, बँक तपशील, शिधापत्रिका (नसल्यास कुटुंबातील सर्व सदस्यांचे आधारकार्ड), अतिरिक्त कागदपत्रे अथवा माहिती लाभार्थ्यांना एमएसएमई विभागाने विहीत केलेल्या आवश्यकतेनुसार अतिरिक्त कागदपत्रे किंवा माहिती देणे आवश्यक राहील.

# बल्लारपूर विधानसभेला विकासाच्या मार्गावर कायम अग्रेसर ठेवणार-ना.सुधीर मुनगंटीवार

## निरंतर विकासासाठी कटिबद्ध असल्याचा विश्वास;बल्लारपूर येथे ४ कोटींच्या रस्ता बांधकामाची पायाभरणी







**चंद्रपूर । प्रतिनिधी**

'बल्लारपूर विधानसभेचा लोकप्रतिनिधी म्हणून मला विकास करण्याची संधी मिळाली आहे. बल्लारपूर हा तालुका महाराष्ट्राच्या एका टोकाला असला तरीही विकासाच्या बाबतीत राज्यातील इतर तालुक्यांच्या तुलनेत अग्रेसर आहे. मी या विधानसभेच्या निरंतर विकासाचे ध्येय डोळ्यापुढे ठेवले आहे, त्यामुळे भविष्यात सुद्धा बल्लारपूरची विकासाची घोडदौड अशीच कायम राहील,' अशी ग्वाही राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.बल्लारपूर येथील सिताबाई सावरकर चौक ते डॉ. ए.पी.जे. अब्दूल कलाम चौक पर्यंतच्या सिमेंट रस्त्याच्या बांधकामाची पायाभरणी करतांना ते बोलत होते. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, वनविकास महामंडळाचे माजी अध्यक्ष चंदनसिंग चंदेल,तहसीलदार डॉ. कांचन जगताप, न.प. मुख्याधिकारी विशाल वाघ, कार्यकारी अभियंता मुकेश टांगले, भाजपा शहर अध्यक्ष काशिनाथ सिंह, देविदास उमरे, विकास दुपारे, मनिष पांडे, नीलेश खरबडे, अरुण वाघमारे आदी उपस्थित होते.कितीही विकास केला तरी बल्लारपूर येथील नागरिकांच्या ऋणातून मुक्त होऊ शकत नाही, असे सांगून पालकमंत्री मुनगंटीवार म्हणाले, अनेक वर्षांपासून शहरातील डॉ. झाकीर हुसेन वॉर्ड ते राजेंद्र वॉर्ड पर्यंतच्या सिमेंट रस्त्याची नागरिकांची मागणी होती. त्यानुसार या रस्त्यासाठी आराखडा तयार करण्याच्या सुचना सा.बा. विभागाला दिल्या व ४ कोटी रुपये उपलब्ध करून दिले. निधी मंजूर झाला असला तरी रस्त्याची गुणवत्ता आणि दर्जा यावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी प्रशासकीय यंत्रणेसोबतच स्थानिक नागरिकांची सुध्दा आहे. कारण आपल्या अनेक पिढ्या या परिसरात राहात आल्या आहेत व भविष्यातसुध्दा राहणार आहे. त्यामुळे रस्त्याचे काम हे उत्तमच व्हायला पाहिजे, याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने विशेष लक्ष द्यावे, अशा सुचना पालकमंत्री मुनगंटीवार यांनी दिल्या.वर्षानुवर्षे महसूलच्या जमिनीवर वास्तव्य करणा-या कुटुंबाना घरकुल पट्टे देण्यासाठी जिल्ह्यात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. मात्र रेल्वे आणि वन विभागाच्या जमिनीबाबत केंद्र सरकारचे नियम आहेत. त्यामुळे या जमिनीवरील घरकुल पट्टे देण्यासाठी केंद्र सरकारसोबत बोलणी सुरू आहे, असे पालकमंत्री मुनगंटीवार यांनी सांगितले.बल्लारपूर येथे एकाच दिवशी मिनी स्टेडीयमच्या कामाचे भुमिपूजन (१ कोटी २९ लक्ष), सिमेंट रस्त्याची पायाभरणी (४ कोटी) आणि न.प. इमारतीच्या बांधकामाची पायाभरणी (१० कोटी) करण्यात आली आहे.यावेळी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते देवराव निंबेकर, प्रभाकर वैद्य, प्रकाश जमदाडे, प्रभाकर पोटे, काशीनाथ पचारे, देविदास उमरे, मारोती वाळके, सदर्शन मोगराम, मोहम्मद मुसाजी आदींचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

## नेहा महाजनच्या'फेक मॅरेज'चित्रपटाचा वर्ल्ड डिजिटल प्रीमियर'अल्ट्रा झकास'मराठी ओटीटीवर

**मुंबई । प्रतिनिधी**

लग्न म्हणलं की नातेवाईक आणि समाज यांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या मोठा सहभाग असतोच. मानपान, रूसवे फुगवे, दिखावे आणि देखाव्यांचा कार्यक्रम साहजिकच आहे, पण जर का खरं खरं झालेलं लग्न खोटा खोटा दिखावा असला तर? फेक मॅरेज मधील जर तरच्या धमाल गोष्टीत बऱ्याच कमाल घटना घडणार आहेत. '६ नोव्हेंबर २०२३' रोजी 'अल्ट्रा झकास' या मराठी ओटीटीवर या चित्रपटाचा 'वर्ल्ड डिजिटल प्रीमियर' होणार आहे.

चित्रपटाचे दिग्दर्शन स्वतंत्र (सवि) गोयल यांनी केले असून नेहा महाजन आणि भूषण प्रधान यांची सुपरहिट जोडी प्रेक्षकांना चित्रपटात पहायला मिळणार आहे. चित्रपटाची कथा अवनी (नेहा महाजन) आणि तिच्या कलेक्टर होण्याच्या स्वप्नाभोवती फिरते. आपलं स्वप्न मुंबईला जाऊन पूर्ण होऊ शकेल म्हणून तिला आलेल्या स्थळाला तिचा होकार येतो आणि तिचा स्वप्नांचा पाठलाग सुरू होतो. स्वप्नांच्या मागे धावताना नाती आणि नात्यांतील होणारे बदल तिच्या आयुष्याला एका अनपेक्षित वळणावर घेऊन जातात. अवनी तिचं स्वप्न साकार करेल की नाही? हे चित्रपटात पाहायला मिळणार आहे.तरुणांची स्वप्न आणि त्यांचं त्या स्वप्नांमागे बेभान होऊन धावणं या चित्रपटात प्रखरपणे चित्रित केले आहे.'फेक मॅरेज'याची कथा उपदेशक असून यासारखे अनेक चित्रपट भारताच्या भविष्याला म्हणजेच आजच्या तरुणांना आपलं ध्येय साधण्यासाठी मनोरंजनासोबतच एक प्रेरणा म्हणून 'अल्ट्रा झकास' ओटीटीच्या माध्यमातून प्रदर्शित करणार आहोत.असे अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रा.लिमिटेडचे सी.ई.ओ. सुशीलकुमार अग्रवाल म्हणाले.




## राजे फॅन्स क्लब तर्फे भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन

**अहेरी । प्रतिनिधी**

अहेरी इस्टेटचे राजे तथा माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम हे क्रीडा स्पर्धेला प्रोत्साहन देत असताना आणि आपल्या क्षेत्रातील युवकांना क्रीडा स्पर्धेत सहभाग घेऊन आपलं भविष्य क्रीडा क्षेत्राच्या माध्यमातून घडवावे आणि आपल्या क्षेत्राचं नावलौकिक करावे यासाठी ते नेहमीच युवकांना प्रेरीत करत असतात. दरवर्षी अहेरी विधानसभा क्षेत्रातील प्रत्येक तालुक्यातील अनेक गावांत क्रीडा स्पर्धेसाठी पारितोषिके देत असतात. माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांच्या कडून सिरोंच्या तालुक्यातील नगरम येथे राजे फॅन्स क्लब तर्फे भव्य कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती,त्या स्पर्धेत मोठ्या संख्येने गडचिरोली जिल्ह्यातील कबड्डी संघ सहभागी झाले होते. युवा कबड्डी स्पर्धकांचा जोश व उत्साह यावेळी कबड्डी स्पर्धे दरम्यान पाहायला मिळाला.



यावेळी माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांच्या तर्फे प्रथम क्रमांक विजेत्या, उडान संघाला शिल्ड व एकवीस हजार रुपये पारितोषिक देण्यात आले तर द्वितीय क्रमांक विजेत्या एस. के. नगर संघाला शिल्ड अकरा हजार रुपये पारितोषिक सिरोंच्या तालुक्यातील भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी सिरोंच्या तालुक्यातील भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी शंकर गरहरी, राजेश संतोषवार, सितापट्टी गहू, चंद्रशेखर चेम्मकरी, राम सीरंगी, शाहरुख पठाण,नागराजू गौरापु महेश गौरारपू, शुभम येरोला,महाकाली गांगुरी तसेच युवा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोमवार दि.६ नोव्हेंबर रोजी लोकशाही दिनाचे आयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी आणि अडचणी यांची न्याय व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही दिनाचे आयोजन दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी करण्यात येते. या लोकशाही दिनानिमित्त नागरीक व शेतकरी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल करतात. सोमवार दि. ६ नोव्हेंबर २०२३ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हास्तरीय लोकशाही दिनात तक्रार सादर करतांना विहित नमुन्यातील तक्रार अर्जासोबत तालुका लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची प्रत तसेच १५ दिवस आधी २ प्रतीत अर्ज सादर करावा. तक्रार व निवेदन वैयक्तिक स्वरुपाची असावी, तद्नंतरच तक्रार अर्ज स्वीकारण्यात येईल, असे निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार यांनी कळविले आहे.

## समाजरत्न पुरस्कार २०२३ ने डॉ.अंकुश आगलावे यांचा गौरव

### राज्यपाल याचे हस्ते राजभवन येथे पुरस्कार प्रदान

**मुंबई । प्रतिनिधी**

भारत सरकारचे युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय व्दारे नेहरू युवा केंद्र, मुंबई तर्फे डॉ. आगलावे यांना विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल समाजरत्न पुरस्कार २०२३ ने महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल रमेश बैस यांचे हस्ते राजभवन येथे आयोजित कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रकाश मनोहर जिल्हा अध्यक्ष महाराष्ट्र गोवा, नेहरू युवा केंद्र तसेच जिल्हा युवा अधिकारी निशांत रौतेला उपस्थित होते. या पुरस्कार समारंभात देशातील कोना कोप-यातील अनेक सामाजिक कार्यकर्ता उपस्थित होते. डॉ. आगलावे यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबवून समाज हिताचे कार्य केले आहे. मेरी माटी मेरा देश या उपक्रमात अतुलनिय कार्य केले आहे. यापूर्वीही त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे त्यात भारत भुषण, राष्ट्रीय पुरस्कार, सेवारत्न पुरस्कार, कोरोना योध्दा पुरस्कार, डॉक्टरेट पदवी इत्यादीने गौरविण्यात आले आहे.



शिर्डी संस्थान व संत गजानन महाराज संस्थानाने डॉ. आगलावे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेवून त्यांचा सपत्नीक सत्कार केला. डॉ. आगलावे हे गुरूदेव प्रचारक असून ग्रामगीता प्रचार व प्रसार करून अंधश्रध्दाचे निर्मुलन करण्याचे कार्य करीत आहे. गुरूदेव सेवा मंडळ व केंद्रीय मानवाधिकार संगठनच्या वतीने अनेक सामाजिक लोकउपयोगी उपक्रम राबवून गरीब, गरजु, वंचित, शोषित, निराधार महिला, प्रकल्पग्रस्त शेतक-यांना मदतीचा हात देत आहे. समाजिक क्षेत्रात अत्यंत मोलाचे कार्य करीत आहे. कोरोना काळात वंचित, गरजुंना अन्न धान्याचे किट्स तथा २४ तास रूग्णवाहिका उपलब्ध करून मदत केली आहे.डॉ. आगलावे यांनी अनेक सामाजिक व राजकीय पदे भुषविले आहे त्यात भाजपा जिल्हा ओबीसी महामंत्री असून ओबीसी बांधवाच्या अनेक समस्या शासनदरबारी नेवून अन्याय विरूध्द आवाज उठविला आहे. श्री. गुरूदेव व्यायाम शाळा, पंतजली किसान सेवा समिती, श्री. गुरूदेव प्रचारक, केंद्रीय मानवधिकार संगठन, जिल्हा संघटक ॲलेन थिलक शितोन्यु स्कुल इंटरनॅशनल ब्लॅक बेल्ट डॉन असे अनेक पदे भुषवून त्याव्दारे समाजकार्य करून सामाजिक बांधीलकी जपली आहे.

## एआय फ्युचर स्किल्स मुळे रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतील-डॉ.गजेंद्र आसुटकर

### एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ,बल्लारपूर कॅम्पस येथे आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) या विषयावर व्याख्यान संपन्न

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आर्टिफिशियल इंटेलिजन्स हे भविष्यातील प्रत्येकाचे स्किल्स राहणार आहे आणि हे स्किल्स भविष्यात अनेक रोजगाराच्या संधी निर्माण करतील. एआय हे तंत्रज्ञान जग काबीज करेल सोबतच तरुणांना आकर्षित करेल असे मत डॉ. गजेंद्र आसुटकर यांनी व्यक्त केले. ते

एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ मुंबईचे महर्षी कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञानसंकुल बल्लारपूर येथे आयोजित आर्टिफिशियल इंटेलिजन्स या विषयावरील व्याख्यान कार्यक्रमात बोलत होते.

एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ बल्लारपूर येथे फ्युचर स्किल्स - आर्टिफिशियल इंटेलिजन्स मधील संधी या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते,



या व्याख्यानाला मुख्य वक्ता म्हणून डॉ. गजेंद्र आसुटकर, उपप्राचार्य, प्रियदर्शिनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, नागपूर उपस्थित होते. सदर कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून ज्ञानसंकुलचे संचालक डॉ. राजेश इंगोले, प्रमुख उपस्थिती सहायक कुलसचिव डॉ. बाळू दत्तात्रय राठोड आणि समन्वयक वेदानंद अलमस्त उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक वेदानंद अलमस्त यांनी केले सोबतच आधुनिक काळात मानव आणि तंत्रज्ञान यांच्या संयुक्त कामगिरीने भारत जगात आपले नाव उंचावेल अशी आशा व्यक्त केली.कार्यक्रमाचे मुख्य वक्ता म्हणून लाभलेले डॉ. गजेंद्र आसुटकर यांनी एआय बद्दल सर्व विद्यार्थिनींना अवगत केले सोबतच आर्टिफिशियल इंटेलिजन्स हा फक्त एक शब्द नसून हा एक बदल आहे. ह्या तंत्रज्ञानामुळे भविष्यात जगाचे रूप बदलणार आहे. येणारे २१ वे शतक हे फक्त आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाचे आहे असे लक्षात ठेवले जाईल, कारण तेव्हा ह्याचा वापर प्रत्येक क्षेत्रात करून अनेक क्षेत्र विकसित होऊ शकतात. जेव्हापासून मशीनची कल्पना अस्तित्वात आली तेव्हापासून एआयने लोकांच्या जीवनावर महत्त्वपूर्ण प्रभाव पाडला आहे. आज, मशीन्स तोंडी आदेश समजतात, चित्रे ओळखतात, कार चालवितात, गेम्स खेळतात आणि मानवांच्या कार्यपद्धतीपेक्षा बरेच काही चांगले काम करतात असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे अध्यक्षीय मनोगत संचालक डॉ. राजेश इंगोले यांनी व्यक्त केले आणि भविष्यात आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाचा वापर करून जगात अव्वल राहण्याचे काम कस करता येईल यावर भर देण्याचे आवाहन सुध्दा केले. भविष्यात असे नव-नवीन उपक्रम राबविण्याचे आश्वासन सुध्दा दिले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता प्रा. अश्विनी वाणी, प्रा. खुशबू जोसेफ, प्रा. श्रुतिका राऊत यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे संचालन आणि आभार प्रदर्शन प्रा. नेहा गिरडकर यांनी केले. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .